# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६१७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२६/०९/२०१६

**१) घरात प्रवेश करुन जिवानीशी मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०९/०१६ रोजी ०७.३० वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी हे वडील व मुलगा असुन वेगवेगळया ठिकाणी राहतात व त्यांचे आपसात पटत नाही. यातील आरोपी याने फिर्यादीचे घरात अन्यायाने प्रवेश करुन 'तुने मेरे बारेमे पोलीस मे तक्रार दिया था' और मुझे पैसे केस के लीये दो असे बोलुन जिवानीशी मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी हनुमानदास हरीदास अग्रवाल वय ७५ वर्ष, रा. सिव्हील वार्ड साकोली यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५२,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) विवाहीतेस शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १४/०६/२०१६ ते २२/०९/२०१६ पर्यत. यातील फिर्यादी हीचे सन २००९ मध्ये जातीरीवाजा प्रमाने लग्न होवुन लग्नानंतर तिला माहेरुन ५०,०००/–रु. आण असा तगादा लावुन तिला यातील आरोपी हे पैश्याची मागनी करुन तिच्या चारीत्र्यावर संशय घेवुन तिला मारपीट करुन शारीरीक व मानसीक त्रास देत असल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) अवैधरित्या जनावरांना कोंबुन निर्दयतेची वागणुक देवून वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २५/०९/२०१६ रोजी १४.३० वा. दर. यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक मध्ये १ म्हैस, १० गायी, २१ गोरे, २ गोरी असे एकुण ३४ जनावरे कोंडुन भरुन जनावरांना निदर्यतेची वागनुक देवुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने फिर्यादी शिवा कैलासराव भंडारी वय २१ वर्ष, रा. गांधी चौक तिलकवार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ११(१)(ड) प्राणी निर्दयतेने वागविण्याचा कायदा सहकलम ११९ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २५/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १२२ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ०४ केसेस व ईतर वाहनांवरती ११५ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

२६/९/१६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.